# Research Ambition

## An International Multidisciplinary e-Journal

**Vol.1, Issue-III (Nov. 2016)** **ISSN-2456-0146**

**Peer Reviewed & Open Access (e-Journal)** **Indexed**



**Indexed:** **IIJIF, DOI, DDIJ, TDT, MIAR, INDIAN, THOMSON REUTERS, ISSUU, SIS, CITE FACTOR, IJ INDEX, RESEARCH BIB, ISSN, NISCAIR, SCHOLARLY OPEN ACCESS, SCIENCE, DOIDS, COSMOS, SCHOLARSTEER, AEGLOBAL, ESJI, GOOGLE SCHOLAR, JOURNAL INDEX, ICMJE.**

**Impact Factor: 3.071**

**(International Innovative Journal Impact Factor)**

PEER REVIEWED & OPENED ACCESS INDEXED e-JOURNAL



**Editor-In-Chief**

**Mr. Raj Kumar Verma**

**52 Mayur Market, Thatipur Morar Gwalior M.P. (India) Pin- 474011**

**Ph.: +91 0751-4066000, Mob. +91 9755599942**

**Email:-** *rajverma1257@gmail.com*, *publish2017@gmail.com*

**Website:** http://www.researchambition.com/



Mahatma Gandhi Arts, Science & late N.P. Commerce College Armori

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

**Research Ambition** ISSN: 2456-0146
An International Multidisciplinary e-Journal
(Peer Reviewed, Open Access & Indexed)
Web: www.researchambition.com, Email: publish2017@gmail.com
Impact Factor: 3.071 (IIJIF)
Vol. 1, Issue-III
Nov. 2016

# नामदेव ढसाळ यांच्या काव्यातील सामाजिकता

**प्रा. डॉ. विजय रैवतकर**
सहायक प्राध्यापक
महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी

मराठी दलित साहित्यातील एक विद्रोही कवी म्हणून समस्त साहित्य रसिकांना परिचित असे नाव म्हणजे नामदेव ढसाळ. नामदेव ढसाळ यांचे 'गोलपीठा', 'मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले', 'आंबेडकरी चळवळ', 'तुही इयत्ता कंची तुही इयत्ता', 'खेळ', 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्रः प्रियदर्शिनी', 'या सत्तेत जीव रमत नाही', 'गांडू बगीचा', 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे', 'तुझे बोट धरून मी चाललो आहे' आदी काव्यसंग्रह प्रकाशित झाले. यातून नामदेव ढसाळ यांची प्रतिभा जगाला परिचित झाली. त्यांच्या असामान्य प्रतिभेचे दर्शन साहित्यरसिकांना झाले।

नामदेव ढसाळ यांची कविता मराठी कवितेतील महत्त्वाचा मानबिंदू आहे. त्यांच्या कवितेतून प्रकटणाऱ्या सामाजिक जाणिवेतून शोषित–पीडितांच्या व्यथा आणि वेदना प्रकट होतात. शतकानुशतके दडपल्या गेल्लेल्या समाजाच्या व्यथा व शोषणाविरुद्ध त्यांची कविता पहिल्याप्रथम आवाज उठविताना दिसते. नामदेव ढसाळ यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून व्यवस्थेविरुद्ध बंड केले. कविता लिहित असतानाच्या काळात 'कविता हे राजकारण आहे' असे म्हणत त्यांनी अमेरिकेतील ब्लॅक पॅंथरच्या धर्तीवर दलित पॅंथर ही क्रांतीकारी संघटना स्थापन केली. दलितांवरच्या वाढत्या अत्याचाराचा मुकाबला करण्यासाठी दलित चळवळ प्रभावी ठरत नाही त्यासाठी क्रांतीकारी चळवळ उभारण्याच्या दृष्टीने ढसाळांनी उचलेले हे पाऊल होते। ही तरुणांची चळवळ होती। जिथे जिथे दलितांवर अत्याचार होत होता तिथे तिथे ही संघटना संघर्षासाठी धावून जात होती। रस्त्यावर उतरून संघर्ष करणे, अत्याचाराला विरोध करणे हे दलित पॅंथरचे वैशिष्ट्या होते। 1970–80 च्या दशकात महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजिक जीवनात खळबळ माजवून देणाऱ्या दलित पॅंथरने आपला दबदबा निर्माण केला होता। यातूनच ढसाळाची चळवळी वृत्ती निर्माण होत गेली। त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील चळवळी वृत्ती आणि अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची संघर्षशीलता स्वाभाविकच त्यांच्या प्रतिभेचा विशय झाली। गोलपिठा या काव्यसंग्रहातील कवितांतून प्रकटणाऱ्या सामाजिक जाणिवा व समाजविघातक प्रवृत्ती विरुद्ध केलेला विद्रोह, त्याचेच फलित होय।



Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli